पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्र. २

दिनांक :- १७/०२/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक १७/०२/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक सभापती
२. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
३. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा. लोंढे गणेश नारायण
५. मा. शमीम पठाण
६. मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव
७. मा. डोके अपर्णा निलेश
८. मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख
९. मा. साबळे छाया जगन्नाथ
१०. मा. जगताप विमलताई सुरेश
११. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१२. मा. बारणे निलेश हिरामण
१३. मा. बारणे झामाबाई बाळासाहेब
१४. मा. पवार यमुनाताई रमणनाना
१५ मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. क्षेत्रीय अधिकारी - सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता - रविंद्र दुधेकर – स्थापत्य, गोपाळराव चिंचवडे - विद्युत, वसंत काची -जलनि:सारण, प्रशासन अधिकारी - शांताराम राऊत, लेखाधिकारी - सुरेश आव्हाळे, उपअभियंता - के.डी. फुटाणे, सी.बी. कोंडे, , एस.एम.कुदळे, एन.आर. निंबाळकर – स्थापत्य, व्ही.एन.देसले, एफ. बी. शेख - पा.पु., आर.बी. चांदेरे – उद्यान, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, कुलकर्णी एस.एस. इत्यादी.

मा. अध्यक्ष – सन्मा. सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करणेत येत आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष मा. ओव्हाळ शेखर अशोक तसेच ब प्रभाग समितीमध्ये नव्याने वर्ग झालेल्या सन्मा. नगरसदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २. सन २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-२०१५ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत.

विषय क्र. ३. रस्त्याचे नांमकरण करणेबाबत – मा. गणेश लोंढे, यांचा प्रस्ताव

विषय क्र. ४ नाले सफाई कामकाजाबाबत.

---------

अ) नवीन विस्तारित तालेरा रुग्णालयाचे नांमकरणाचा विषय दिनांक १८/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये ठराव क्र. ९० अन्वये झालेला असलेने, दिनांक १५/१/२०१४, रोजीचे सभावृत्तांतामधील विषय क्र. ८, ठराव क्र ८९ वगळून दिनांक १५/१/२०१४ (कार्यत्रिका क्रमांक ११) रोजीचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १८/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ६/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्र. २ — विषय क्र. १

दि. १७/०२/२०१४ — विभाग : स्थापत्य, ब क्षेत्रीय कार्यालय

सूचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव — अनुमोदक : मा. शमीम पठाण

संदर्भ : क्र. स्था/बप्र/१६/६४/२०१४,दिनांक ०३/०२/२०१४.

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेचे कामास र. रु. ९,९९,७००/- (अक्षरी र.रु. नऊ लाख नव्व्यान्नव हजार सातशे फक्त) हे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३ विषय क्र. २

दि. १७/०२/२०१४ विभाग : लेखा, ब क्षेत्रीय कार्यालय

सूचक : मा. साबळे छाया जगन्नाथ अनुमोदक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : क्र. बप्र/लेखा/८/कावि/२१/२०१४,दिनांक १७/०२/२०१४.

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ब क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) मधील कलम (७) चे पोटकलम (ब) नुसार मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकाचे अवलोकन होणेस व पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. ४ विषय क्र. ३

दि. १७/०२/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सूचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दिनांक १७/०२/२०१४ चे पत्र.

दळवीनगर मधील पंढरीनाथ दळवी यांच्या निवास स्थानापासून ते विनायकनगर पर्यंत अद्याप कोणतेही नामकरण झाले नसून सदर रस्त्याला कै. सुंदराबाई विनायक दळवी मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. ५ विषय क्र. ४

दि. १७/०२/२०१४ विभाग : आरोग्य, ब क्षेत्रीय कार्यालय

सूचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक : मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा

संदर्भ : क्र.ब.क्षे.का./०७/कावि/६५/२०१४, दिनांक १३/०२/२०१४.

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामकाजासाठी खर्चाचे अंदाजपत्रक मा.कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांचेकडून मागविणेत आलेले आहे. ब क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र. 21, 42, 50, 51 व 53 मधील एकुण 9 नाले साफसफाई कामकाजासाठी नाले साफसफाई र. रु. 264745.20/- व नाल्यातील निघालेल्या गाळाची वाहतुक करणेकामी 353704.37 असे एकुण अंदाजे र.रु. 618449.56/- इतका खर्च

अपेक्षित असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयातील नाले साफसफाई कामकाजाकरीता उपरोक्त अंदाजपत्रकात र.रु. 618449.56/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन 2014-15 करीता नाले साफसफाई कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु. 20,00,000/- इतकी करण्यात आलेली आहे. सदर कामास व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( ओव्हाळ शेखर अशोक )
अध्यक्ष
ब प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/४४/२०१४
दि. २६/०२/२०१४.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.